| | | | |
|---|---|---|---|
| **दाखल दिनांक** | २० | ०४ | १९९७ |
| **नोंदणी दिनांक** | २० | ०४ | १९९७ |
| **निकाल दिनांक** | १० | ०७ | २०२६ |
| **कालावधी** | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | **२९** | **०२** | **२४** |

| | |
|---|---|
| **MHYA050006391997** | **पुसद येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. २ यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी-श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**<br>**-: न्यायनिर्णय :-**<br>(घोषीत दिनांक १०.०७.२०२६)<br>नि.फौ.ख.क्र.८१/१९९७, **निशाणी क्रमांक-५१**<br>गु.र.नं.१०२/१९९७ पुसद शहर पोलीस स्टेशन, पुसद |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन द्वारा<br>पोलीस निरीक्षक, पो.स्टे.पुसद शहर,<br>ता.पुसद जि.यवतमाळ |
| अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता | श्री.के.ए.मुळे |
| आरोपी | **मोहब्ब्तखॉ शेरखॉ पठाण,**<br>वय -७८ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा.मोतीनगर, दिग्रस ह.मु.मधुकरनगर, पुसद<br>ता.पुसद, जि.यवतमाळ. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | |
| **भाग-ब** | |
| गुन्ह्याची तारीख | १३/०४/१९९७ |
| प्रथम खबर दिनांक | १४/०४/१९९७ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | १४/०४/१९९७ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २७/०७/१९९९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १६/०८/१९९९ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्तता. |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआरपीसी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मोहब्बतखॉ शेरखॉ पठाण,** | १४/०४/१९९७ | ०९/०५/१९९७ सुचनापत्रावर सोडले | भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वये | निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

## भाग–क

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | डॉ.दयाराम लोभासिंग जाधव | वैद्यकीय अधिकारी |

**ब.बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| सी. सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे/ बचाव/कोर्ट निशाणीअ.अभियोग**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |
| **ब. बचाव** | | |
| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
| १ | निरंक | निरंक |
| **क. कोर्ट निशाणी** | | |
| **अनु. क्र.** | **निशाणी क्र.** | **तपशील** |
| १ | निरंक | निरंक |
| **ड. मुद्देमाल** | | |
| **अनु. क्र.** | **मुद्देमाल क्र.** | **तपशील** |
| १ | निरंक | निरंक |

## -: न्यायनिर्णय :-
## (घोषीत दिनांक १० जुलै, २०२६)

**१)** प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वये दोषारोप ठेवून खटल्याची संपरिक्षा करण्यात आली.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे**

**२)** अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात अशी की, फिर्यादी रवि सखाराम हे वरुड येथे राहणारे असून प्रतिक धाब्यावर काम करतात. दिनांक १३.०४.१९९७ रोजी रविवारी सायंकाळी ७.०० वाजताच्या सुमारास ते धाब्याच्या समोरील कोठ्याजवळ गेले. तेव्हा त्यांना मामु दिग्रसवाला हा भेटला. त्याला फिर्यादीने मजाकमध्ये म्हटले की, ‘तु दररोज दारू विकतोस पोलीसला सांगू का’ असे म्हणताच आरोपीने त्याच्या

हातातील लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डोक्यात मारले व त्यामुळे त्यांचे डोके फुटले. तसेच आरोपीने पुन्हा जर पोलीसाचे नाव घेतले तर फिर्यादीला जिवाने मारुन टाकीन अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध पुसद शहर पोलीस स्टेशन, पुसद जि.यवतमाळ येथे गु.र.नं.१०२/१९९७ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ अन्वये गुन्हा नोंदविला.

**३)** तपासी अधिकारी हे.कॉ.पुरुषोत्तम लक्ष्मणराव थोरात यांनी प्रस्तुत गुन्ह्याचा तपास केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, मुद्देमाल जप्त केला व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले व फिर्यादीचे जखमी प्रमाणपत्र प्राप्त केले. त्यानंतर त्यांनी तपास पुर्ण करून दोन्ही आरोपीविरूद्ध या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४)** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वये **निशाणी क्रमांक-१३** प्रमाणे दोषारोप निश्चित केले. आरोपीने **निशाणी क्रमांक-१४** प्रमाणे गुन्हा कबुल केला नाही व प्रस्तुत प्रकरणाची संपरीक्षा घेण्याची विनंती केली. त्यामुळे आरोपीविरुद्ध प्रस्तुतचा खटला पुढे चालविण्यात आला.

**५)** अभियोगपक्षातर्फे केवळ 'एका' साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोगपक्षाचा पुरावा बंद झाल्यानंतर आरोपीविरुद्ध कोणताही सबळ पुरावा मिळून न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ (१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

**६)** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.के.ए.मुळे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. सर्व पुराव्याचे अवलोकन केले त्यावरुन खालील प्रश्न उपस्थित होतात. त्यास खालील कारणांस अनुसरुन निष्कर्ष नोंदविले.

| अ.क्र | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे शाबित केले काय की, आरोपीने दिनांक १३/०४/१९९७ रोजी सायंकाळी ७.०० वाजताच्या सुमारास रा.वरुड, पुसद ता.पुसद जि.यवतमाळ येथील फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी पाईपने मारहाण केली आणि त्याद्वारे उपरोक्त आरोपी यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वये अपराध केला? | **नाही.** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## -: **का र ण मि मां सा** :-

**७)** अभियोगपक्षातर्फे आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता केवळ 'एका' साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षीदार क्रमांक-१ दयाराम लोभासिंग जाधव (वैद्यकीय अधिकारी) यांची साक्ष ***निशाणी क्रमांक*-१७** वर नोंदविण्यात आली. तसेच, सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभियोगपक्षाचा पुरावा ***निशाणी क्रमांक- १*** प्रमाणे बंद केला. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे त्यांचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

**प्रश्न क्रमांक १ करीता**

**८)** प्रश्न क्रमांक-१ वरील प्रश्न विवेचनासाठी घेऊन त्यावरील निष्कर्ष नोंदविण्यात आले आहे.

**९)** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक-१ दयाराम लोभासिंग जाधव यांची साक्ष ***निशाणी क्रमांक*-१७** वर नोंदविण्यात आली. त्यांनी सरतपासादरम्यान कथन केले की, दिनांक १३.०४.१९९७ रोजी ते ग्रामीण रूग्णालय, पुसद येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी रात्री ९.४५ वाजेच्या सुमारास त्यांच्याकडे फिर्यादी

रवि सखाराम डांगे यांना उपचाराकामी पो.हे.कॉ.४०१ हे घेवून आले होते. फिर्यादी साक्षीदार हे जखमी अवस्थेत होते. फिर्यादीला तपासाल्यानंतर त्यांनी पाहिले की, फिर्यादीला एक ते दोन तासापूर्वी जाड आणि बोथड वस्तुने कपाळावर मारल्यामुळे जखम झाल्याचे दिसले. त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविले असता त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे व त्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. त्यास ***निशाणी क्रमांक-१८*** देण्यात आला आहे. उलटतपासात त्यांनी मान्य केले की, फिर्यादीला झालेली जखम जमीनीवर स्वत:हुन पडल्यामुळे देखील होवू शकते. वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यावरु हे दिसून येते की, घटनेच्या दिवशी फिर्यादीला कपाळावर जखम झालेली होती व त्यांनी उपचार केला होता. परंतु, फिर्यादीला ती जखम जमिनीवर पडल्यामुळे देखील होवू शकते असे त्यांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे फिर्यादीला घटनेच्या दिवशी जखम झालेली असली तरी ती जखमी आरोपीनेच मारहाण केल्यामुळे झाली असा काही पुरावा अभिलेखावर नाही. तसेच, फिर्यादीला झालेली जखम जमिनीवर पडल्यामुळे देखील होवू शकते म्हणून फिर्यादीला जखम कोणत्या कारणाने झाली याबाबत शंका निर्माण होते.

**१०)** अभियोगपक्षाने दिलेल्या उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार क्रमांक-१ यांनी आरोपीवरील दोषारोप सिद्ध होईल असे काहीही कथन केले नाही. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी, इतर साक्षीदार, घटनास्थळ पंचांना वारंवार समन्स काढून देखील ते पुराव्याकामी हजर झालेले नाही. वैद्यकीय प्रमाणपत्रा **निशाणी क्रमांक-१७** यावरुन केवळ हे सिध्द होते की, फिर्यादी घटनेच्या दिवशी जखमी झाले होते. परंतू, उपरोक्त वेळी व ठिकाणी आरोपीनेच फिर्यादीला लोखंडी पाईपने डोक्यावर मारहाण करुन जखमी केल्याचे सबळ पुराव्याअभावी सिद्ध होत नाही. उपरोक्त सर्व कारणास्तव, आरोपीने भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वयेच्या घटकांनुसार अपराध केल्याची बाब अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवून

निर्विर्वादपणे व निसंशयपणे सिद्ध केली नाही. सदर प्रकरण २८ वर्ष जुने आहे. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी व इतर साक्षीदारांना वारंवार समन्स काढून देखील फिर्यादी हे पुराव्याकामी हजर झालेले नाहीत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात तपासण्यात आलेल्या वैद्यकीय अधिका-याची साक्ष आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे घटनेसंबंधीत घडलेल्या घटनांबाबत दाट संशय निर्माण होत असून आरोपीला संशयाचा फायदा देण्यात येतो व आरोपी या गुन्ह्यातून निर्दोष होण्यास पात्र असल्याच्या निष्कर्षापर्यंत मी पोहोचले आहे. उपरोक्त सर्व कारणास्तव मी प्रश्न क्रमांक-१ निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवत आहे.

**प्रश्न क्रमांक २ करिता**

**११)** वरील सर्व साक्षी पुराव्यावे अवलोकन केले असता व प्रश्नांचे निष्कर्ष विचारात घेतले असता अभियोगपक्ष आरोपीविरुद्धचे दोषारोप सबळ पुराव्याद्वारे सिद्ध करु शकला नाही. तसेच, उपरोक्त साक्षी पुराव्यावरुन घडलेल्या घटनेबाबत संशय निर्माण झाल्याने आरोपीला संशयाचा फायदा देण्यात येवून सर्व आरोपी हे निर्दोष असल्याच्या निष्कर्षापर्यंत मी पोहचले आहे. परिणामतः आरोपी हे निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी प्रश्न क्रमांक-२ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

| -: **आदेश** :- | |
|---|---|
| **१.** | **आरोपी मोहोब्बत खॉ शेरखॉ पठाण** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधामधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| **२.** | आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे. |
| **३.** | गुन्ह्यात जप्त केलेला मुद्देमाल एक लोखंडी पाईप हा मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन नाश करावा. |
| **४.** | आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७ (अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपिल अथवा इतर अर्ज दाखल झाल्यास हजर राहणेसाठी |

| | |
|---|---|
| | म्हणुन दाखल केलेले रक्कम रुपये १५०००/-(रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपात्राची मुदत ६ महिने राहिल. |
| **५.** | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. |

***स्वा/-***

दिनांक १०.०७.२०२६

**(श्रीमती व्ही. डी. बिरहारी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्रं.२),पुसद, जि.यवतमाळ